RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-ल

वर्ष १२, अंक ४०(४)] शुक्रवार, ऑगस्ट ७, २०२६/श्रावण १६, शके १९४८ [पृष्ठे २ , किंमत : रुपये १६.००

असाधारण क्रमांक ७६

प्राधिकृत प्रकाशन

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील
(भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त)
अधिसूचना, आदेश व निवाडे.

कामगार विभाग

मंत्रालय विस्तार, कक्ष क्र. १२३, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ ऑगस्ट, २०२६.

अधिसूचना

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५२.

क्रमांक ईपीएफ-२०२६/प्र.क्र.१७/कामगार-४.—ज्याअर्थी, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५२ च्या कलम १७ च्या पोट-कलम (१) च्या खंड (अ) अन्वये शासन अधिसूचना, कामगार विभाग, क्र. ईपीएफ-११६२/Lab-I, सप्टेंबर, १९६२ द्वारे महाराष्ट्र शासनाने मे. सिल्व्हर ज्युबिली मोटर्स लिमिटेड,१२,मोलेदिना रोड,कॅम्प, पुणे ४११००१ (PU/PUN/१९७७) यांस त्या अधिसूचनेस जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींच्या अधीन राहून कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना, १९५२ च्या तरतुदींच्या प्रवर्तनातून दि. १ जानेवारी १९६१ पासून सूट दिलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, मे. सिल्व्हर ज्युबिली मोटर्स लिमिटेड, १२, मोलेदिना रोड,कॅम्प, पुणे ४११००१ (PU/PUN/१९७७), यांस देण्यात आलेली सूट रद्द करण्याबाबत केंद्रीय भविष्य निर्वाह निधी आयुक्त, यांनी मान्यता दिली आहे.

त्याअर्थी, आता, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५२ च्या कलम १७ च्या पोट-कलम (४) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे मे. सिल्व्हर ज्युबिली मोटर्स लिमिटेड, १२,मोलेदिना रोड,कॅम्प, पुणे ४११००१ (PU/PUN/१९७७) यांस शासन अधिसूचना क्र. ईपीएफ-११६२/Lab-I, सप्टेंबर, १९६२ अन्वये कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना, १९५२ च्या प्रवर्तनातून देण्यात आलेली सूट रद्द करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

दिपक पोकळे,
शासनाचे उप सचिव.

LABOUR DEPARTMENT

Mantralaya Annexe, Room No. 123, Hutatma Rajguru Chowk,
Madam Cama Road, Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 7th August, 2026.

NOTIFICATION

EMPLOYEES' PROVIDENT FUNDS AND MISCELLANEOUS PROVISIONS ACT, 1952.

No. EPF-2026/C.R.17/Labour-4.—Whereas, by Government Notification, Labour Department, No. EPF-1162/Lab-I, dated September, 1962, issued under clause (a) of sub-section (*1*) of section 17 of the Employees' Provident Funds and Miscellaneous Provisions Act, 1952 (19 of 1952), the Government of Maharashtra exempted M/s. Silver Jubilee Motors Limited, 12, Moledina road, Camp, Pune 411 001(PU/PUN/1977) from the operation of the Employees' Provident Fund Scheme, 1952, with the effect of 1st Janaury, 1961, subject to the conditions specified in the Schedule annexed to the said Notification;

And whereas, the Provident Fund Commissioner has recommended the cancellation of the above mentioned exemption granted to the M/s. Silver Jubilee Motors Limited, 12, Moledina road, Camp, Pune 411 001 (PU/PUN/1977).

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*4*) of section 17 of the Employees' Provident Funds and Miscellaneous Provisions Act, 1952 (19 of 1952), the Government of Maharashtra hereby cancels the exemption granted to M/s. Silver Jubilee Motors Limited, 12, Moledina road, Camp, Pune 411 001(PU/PUN/1977) under Government Notification No. EPF-1162/Lab-I, dated September, 1962.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DEEPAK POKALE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.